Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
UGC Approved Sr.No.64259
Vol - V Issue-III MARCH 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# बुध्द, फुले, आंबेडकर आणि स्त्री उन्नती

**डॉ. अशोक डोळस**
बाबुजी आव्हाड महाविदयालय,
पाथर्डी, जि.अहमदनगर

शतकानुशतक, शैक्षणिक, सामाजिक, आणि सांस्कृतिकविकासापासून दुर असणारी स्त्री आज आकाशाला गवसनी घालत आहे. आपल्य ज्ञान, विज्ञान आणि बुध्दीचातुर्याने आंतराळ पादाक्रांत करत आहे. स्त्री ने स्वकार्य, कर्तृत्वाने, बौध्दिक, शारीरिक क्षमता सिध्द केली आहे. इतक्या बुध्दिमान, झाली, प्रेमळ, आणि कर्तव्यदक्ष स्त्रियांना आपल्यादेशात पशूपेक्षा हीन कमी दर्जाचे लेखून वैदिक संस्कृतिने इतकी अवहेलांनाकेली, दासी,भोगदासी, वस्तू म्हणूनच तिचा का विचार केला की पुरूष प्रधान मानसिकता, पण या मुळे या देशाचेझालेले नुकसान कधी ही भरून येणार नाही. अनादी काळापासून पुरूषी मानसिकतेतून इथल्या स्त्रियांची जडणघडणहोत होती. त्या बद्दल स्त्रियांना देखील वाईट वाटत नव्हते.

अशा पिढयानपिढया पासून पशूवत आणि शूद्रातिशुद्रांपेक्षा हीन लुच्छ, दर्जा असणा—या स्त्रियांनाआत्मभान निर्माण करण्याचे, त्यांना अत्मशोध घेण्याची प्रेरणा, अधिकारी या देशात प्रथम तथागत गौतम बुध्दांनी दिला होता. पण बुध्द धम्माच्या—हासानंतरवैदिक संस्कृतीने स्त्रियांचे माणूसपण नाकारले आणि त्यांना पुरूषप्रधान संस्कृतीचे गुलाम बनवले, तथागत गौतम बुध्दांनंतर स्त्रियांच्या उन्नतीचे कार्यजोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले केले.यांनी म जोतीबा फुलेंच्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री कार्याचे रूपांतर कायादयात करून स्त्रीयांना आत्मसन्मान, आत्मभान आणि पुरूषांच्या बरोबरीनी समानतेचा अधिकार दिला, म्हणून या शोधनिबंधात तथागत गौतम बुध्द म जोतीबा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या स्त्री उन्नती कार्याचा शोध घेतला आहे.

**वैदिक संस्कृती आणि स्त्री :**

द्रविडी, सिंधू संस्कृती ही मातृप्रधान संस्कृती होती पण आर्यांच्या अक्रमनानंतर आर्यांनी इथल्याअनार्यांबरोबर संघर्ष केला आणि या संघर्षात इथल्या मुळ, द्रविडी, अनार्यांच्या पराभवझाला आर्यांनी अनार्यांना जिंकून घेतल्यावर अनार्यांवर आपली संस्कृती लादली. या देशात असणारी मातृप्रधान संस्कृती लोपपावलीआर्यांची पुरूष प्रधान सांस्कृतीचा विस्तार व विकास झाला. आर्यांनी इथल्या अनार्यांना, द्रविडांना दास, राक्षस, दासू, ठरवून त्यांचा वध केले, कत्तली केल्या आणि ज्या द्रविडी, नाग अनार्यांनी वैदिक संस्कृतीचा स्वीकार केला त्यांना आपल्या पेक्षा नीच, अस्पृश्य, शुद्र ठरवून वर्ण समाजरचनेस खालच्या दर्जाचे ठरवले. त्याच बरोबर स्त्रियांना नीच ठरवण्यात आले, धर्म संस्कृती, शिक्षण, माणूसपण या पासून यांना कायमचे वंचित केले. आर्यांचा स्त्री कडेपाहण्याचा दृष्टिकोन संबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या क्रांती आणि प्रतिक्रांती या पुस्तकात लिहितात ‘‘पिता आपल्या मुलीशी लग्न करू शकत असे. भाउ आपल्या बहिणीशी सहवास करू शकत असे. ब्राम्हाचा पुत्र ‘दक्ष’ याने आपल्या बहिणीशी विवाह केला यमी हे भाउ बहिण होते. वशिष्ठ याने आपल्या मुलीशी शतरूपासोबत विवाह केला. सोत याने स्वत:च्याच मुलींशी ‘मरीशा’ सोबत विवाह केला. आर्य लोक सर्रास मुक्त पणे यौनाचार करीत असत ऋषी पराशर व ऋषी दीर्घतप यांनी याप्रकारे मुक्तपणे स्त्रीयांसोबत सहवास केला होता घराच्या बाहेर शारीरिक संबंध ठेवण्यात कुठलेही बंधन नव्हते. अशाप्रकारचा संबंध ठेवण्यात कुठलेही बंधन नव्हते अयोनी या शब्दांतून व्यक्त होतो. अयोनी म्हणजे घराबाहेर सीता, व द्रौपदी यांचा जन्म घराबाहेरच्या शारीरिक संबंधातूनच झाला होता. ‘घराबाहेर यौनाचार’ ही गोष्ट सामन्यपणे प्रचलित होती आर्यांत पत्नी आणि मुलींना काही काळाकरीता भाडयान देण्याची प्रथा सुध्दा अस्तित्वात होती आर्यात कोणतीही मुलगी विवाहपूर्व कुठल्याही पुरूषाशी शारीरिक संबंध ठेवू शकत. असे व संतानोत्पत्ती करू शकत असे कन्या या शब्दांचा अर्थच काम असा होतो कुंलातीलमत्सगंधा यांनी अशाप्रकारच्या विवाह संबंध परपुरूषांशी ठेवला होता, एवढेच नव्हे तर पुत्रोत्पती देखील केली, मत्सगंधा हिने भीष्माचा पिता शांतनुसोबत विवाह करण्यापुर्वी ऋषी

परांशंरासोबत संभोग केला होता. इतकेच नव्हे तर पुशंशी सुध्दा यौन संबंध ठेवण्याची पध्दती देखील आर्यात प्रचलित होती, १, या वरून लक्षात येते की वैदिक काळात आर्य संस्कृतीत स्त्रीयांना कोणत्या प्रकारच्या दर्जा होता.

उत्तर वैदिक काळात स्त्रीयांचे माणूसपण नाकारले गेले. पशू पेक्षा हीन दर्जा दिला त्यामुळे स्त्रीयांचा बौध्दिक, सामाजिक आर्थिक विकास होउ शकला नाही. सर्वांगिण विकास होण्यासाठी शिक्षणाची गरज असते पण या देशात शतकानुशतकापासून स्त्रीशुद्रांना शिक्षणाची दारे बंध केली होती. शिक्षणाच्या चाव्या आपल्या जाणण्याला बांधून ठेवण्यात आल्या होत्या त्यांच्या सवलीचा स्पर्शाने देखील या उच्च वर्णीयांना विटाळ, बाट होत असे. पशू पक्षांना देवमानून त्यांची पुजा करत असत. पण माणसासारखा माणूस असून देखील त्यांच्या सावली आणि पावलांच्या स्पर्शाने विंटाळहोत होता. अशा वैदिक संस्कृतीचे गोडवे आज मोठया थाटात गायले जात आहेत. आणि एकविसाव्या शतकाच्या विज्ञान, बुध्दिवादी युगात जगत आहोत तरी स्त्रीया बाहेर पडू काही शुद्रनिशुद्र, आदिवासी आणि स्त्रीयांच्या डोक्यातून हा विषमतावादी विचार संस्कृती जात नाही. मनुस्मृतीने जादलेले बंधने झुगारून दिल्या शिवाय स्त्रियांचा विकास होणार नाही.

**बौध्द संस्कृती आणि स्त्री**

भारताच्या इतिहा प्रथमच स्त्री शुद्रांना, समता, स्वातंत्र्य बंधूता आणि न्यायाचा अधिकार देण्याचे काम तथागत गौतम बुध्दांनी केले, भारताच्या इतिहासात बौध्दकाळ आढळता स्त्रिशुद्रांना माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारला होता. या अशा वैदिक संस्कृतिला अमानुष पध्दतीला, विरोध करून या देशात समता स्वतंत्रय बंधुभाव आणि प्रज्ञा, शील करणेची शिवकण तथागत गौतम बुध्दांनी दिली. पुरूषांच्या बरोबरीनेच स्त्रीयांना आपला सर्वांगिण विकास करण्याचा अधिकार आहे. एव्हडेच नव्हे तर धर्म संस्कृती, धर्मग्रंथ लिहिण्याचा वाचणांचा अधिकार आहे. शिक्षण घेण्याचा आणि देण्याचा अधिकार आहे. हे प्रथम तथागत गौतम बुध्दांनी सांगितले आपल्या धम्म संघात स्त्रीयांना प्रवेश दिला. स्त्रियांना धार्मिक विधी करण्याचा अधिकार दिला. त्यांचे माणूसपण मान्य केले पुरूष इतक्याच स्त्रियांदेखील बुध्दिमान, प्रतिभावन असतात हे प्रथम या देशात बुध्दांनी सांगितले. स्त्री केवळ एक उपभोगाची वस्तू नसून ती देखील मनूष्य आहे. म्हणून बौध्द संघात भिवखून

बुध्दांनी प्रथम स्त्री समनतेची सुरवात आपल्या घरा पासून केली आपली आई गौतमी आणि पत्नी यशोधरा यांना बौध्द संघात प्रवेश दिला नंतर जात धर्म पंथ वर्ण याचा विचार न करता प्रत्येक स्त्रीला धम्म संघात प्रवेश देण्यात येत असे. धम्म संघात प्रवेश घेतलेल्या स्त्रियांना सर्वप्रकारच्या सामाजिक, धार्मिक शिक्षण घेण्याचा व विधी करण्याचा अधिकार देण्यात आला होता. पण आज एकविसाव्या शतकात देखील स्त्रियांना मंदिर प्रवेशासाठी संघर्ष करावा लागतो. पण इ.स.पु. ६ व्या शतकातच बुध्दांनी स्त्रियांना विहारात प्रवेश, मंदिर वाचन, लेखन आणि पुरूषांच्या बरोबरीने वागण्याचा अधिकार दिला होता. स्त्रियांचा एक माणूस म्हणून विचार केला होता. हे जगातील पहिले कार्य होते म्हणून तथागत गौतम बुध्द जगातील पहिले स्त्री उद्‌हारक आहेत. ''बुध्दांच्या विचारधम्मांचा अधिनायक माणूसच आहे. आणि संपुर्ण विश्वाचे अधिनायकत्व माणसाला देणारे बुध्द हे जगले पाहिजे आहेत. बुध्दांचे तत्वज्ञान जडवादीच आहे पण ते तांत्रिक जडवादी मात्र नाही. जड आणि जाणीव यांचे जिवंत प्युजन या जडवादात आहे आणि म्हणूनच हा जडवाद चैतन्यवादाच्या विरोधात प्रखरपणे उभा राहतो.बुध्दांचा विचारधम्म ईश्वर, परलोक आणि वेद मानीत नाही. म्हणून नास्तिकच आहे. या नास्तिक विचारधम्माचे तत्वज्ञान धर्मातीत आहे. त्यामुळेच विचारधम्माने धार्मिक मांडण्या उध्दवस्त केल्या अध्यात्मिक पध्दतीशास्त्र भूई सपाट केलेबुध्द ऐंशी वर्षे जगला. बुध्दाचा जन्म इ.स.पुर्व ५६३ मध्ये झाला आणि मृत्यू इ.स.पू ४४३ मध्ये झाला बुध्दाने पंचेचाळीस वर्षे धम्म वाटला अर्धे शतक तो माणसांना उजेड वाटत फिरला. अज्ञान विषमता, तुच्छाता, अंध श्रध्दा, यांचा मागल्या अनेक शतकांचा अंधार जाळण्याचे कार्य बुध्दांने केले, बुध्दाने ईश्वर मानला नाही. आत्मामानला नाही. बुध्द इहलोकनिष्ट होता. धर्म, संप्रदाय, ईश्वर, आत्मा, स्वर्ग–नरक, परलोक, पूर्वजन्म, पूनर्जन्म यांच्या संकटात सापडलेल्या समाजाला त्यांने त्या संकटातुन बाहेर काढण्याचा कार्यक्रम राबवला मानसांना वरील सर्वच गोष्टीपासून तोडुन त्यांना मानसाशी जोडण्याची मोहीम उभारली माणूस हेच सर्वस्व मानले. त्याला सुखाने जगून देण–या दु:खापासून सुटका करून घेण्याचा बुध्दिवादी, विज्ञानवादी मार्ग त्याने सांगितला''[२] हे विज्ञानवादी, जडवादी तत्वज्ञानचस्त्रिाशूद्रांचा सार्वांगिण विकास करू शकते आज जगात आतंकवाद दहशतवाद, धर्मांध मुलतत्वावादसापासून धोका निर्माण झाला आहे. जग युध्दाचा उंबरठयावर उभे आहे. अशा परिस्थितीत जगाला युध्दाची नव्हे तर

बुध्दाची गरज आहे. भारत बुध्दाची जन्मभूमी आहे. तरी बुध्दांना नाकारन्याचे काम इथले धर्मांध शक्तीकरतात, त्यात त्यांचा स्वार्थ आहे. हेच इथल्या स्त्रीशुद्रांना कळत नाही.

**बौध्दोत्तर काळ आणि स्त्री**

इ.स.च्या पाचव्या शतकापर्यंत भारतात बौध्द तत्वज्ञानाचा प्रचार प्रसार व विस्तार मोठया प्रमाणत झाला होता. वैदिक संस्कृतीची पिछेहाट घेउन बौध्द विचारानुसार लोक जगत होते. अनेक रोजे महाराजांनी बौध्द धम्माचा स्वीकार करून प्रचार, प्रसार केला. यात प्रामुख्याने सम्राट अशोकाचे धम्म प्रचाराचे कार्य खूप विशाल आहे. सम्राट अशोकाने बौध्द धम्माच्या प्रचार प्रसार व विस्तारासाठी अनेक ठिकांनी बौध्द विहारे, स्तुपे बांधली अनेक भिक्खूना राजश्राय दिला. त्यामुळे भारतात व भारताबरोबर बौध्द धम्माचा मोठया प्रमाणात प्रचार व प्रसार झाला होता. पण सम्राट अशोकाच्या नंतर बौध्द धम्माला राजश्रय मिळाला नाही. वैदिक संस्कृतिला राजाश्रय मिळाला. आणि भारतातून बौध्द तत्वज्ञानाचा —हास झाला बौध्द विचार लोप पावले, आणि पुन्हा शूद्रातिशुद्र आणि महिलांवर अनेक निर्बंधने घातले गेले. नंतरच्या राजांनी वैदिक धार्माचे तंतोतंत पालण केले विशेष म्हणजे नंतर मनुस्मृती व पूराणानुसार राजांनी कारभार केल्या मुळे स्त्री शूद्रांवर अनेक बंधने लादली शिक्षणाचा अधिकार, हक्क नाकारला त्यामुळे पुन्हा शूद्रातिशूद्र पुन्हा उच्च वर्णीयांची गुलामी ही दास्यत्व पशूवत जीवन जगणे भाग पडले, बौध्दोत्तर काळात वैदिक धर्माचे पकड अधिक घट झाली. या वैदिक धर्माच्या मगरमिठित इतके जखडून गेल्या की आपण माणूस आहोत हेच ते विसरून गेले. आपण गुलाम, दास, शूद्र, आहोत ही त्यांची मानसिकता झाली केली, या विरूध्द काढण्याची हिमंत कोणी केली नाही अनेक राजे महाराजे, शुरवीर, पराक्रमी पुरूष जन्माला आले, स्त्रियांचा उपभोग घेतला, सटटयावर लावले, गहान ठेवले, दुस—याला वापरण्यास दिले पण स्त्रियांच्या मनाचा, भावनांचा दु:खाचा वेदनाचा या विचार कोणीच केला नाही. एक उपभोगाची वस्तू म्हणूनच तिचा वापर केला. धर्मकारण, राजकारण, शिक्षण, समाजकारणापासून स्त्रियांना दूर ठेवले. त्यामुळे स्त्रियांचा मानसिक भावनिक, सामाजिक विकास झालाच नाही. तिला अनेक धार्मिक बंधनात आडकविण्यात आले. श्रध्दा, अंधश्रध्देच्या जंजाळात तिला गुंतउन ठेवले, या काळात अनेक संत, महंत, ऋषी, मुनी, उदयास आले. पण या स्त्रियांच्या दु:ख वेदनेचा आक्रोश त्याच्या काळजा पर्यंत पोचलाय नाही. अनेकांनी रक्तातील स्त्रियांसोबत, लैंगिक संबंध प्रस्थापित करून त्याला धार्मिक मुलामा चढवून त्याचे उदात्तीकरण केले. आणि आपली लैगिकभूक भागवून घेतली. आर आपण त्याच विचार, संस्कृती आणि धर्माचे आपण गोडवे गातो उदात्तीकरण करत आहोत. याची लाज देखील या संस्कृती रक्षकांना वाटत नाही.

या अशा धार्मिक, सामाजिक शैक्षणिक आर्थिक विकासापासून, मानूसपणापासून हजारो वर्ष दुर असणा—या स्त्रियांच्या उन्नतीचे कार्य एकोणिसाव्या शतका म.जोतीबा फुले यांनी केले एकोणिरसाव्य शतकात प्रथमच म.जोतीबा फुले या देशातील वैदिक धर्मांच्या धर्मग्रंथाची चिकित्सा केली. या देशातील सर्व धर्मग्रंथ, संस्कृती, तत्वज्ञान मानव निर्मित आहे. आणि त्यात बदल करण्याचा अधिकार माणसाला आहे. हे सत्य सांगण्यासाठी गुलामगिरी नावाचा ग्रंथ लिहिला. आणि शतकानुशतकापासूनची धार्मिक गुलामिची जाणीव इथल्या शूद्रांतिशूद्र महिला यांना झाली. म.जोतीबा फुले येथेच थांबले नाहीत तर ज्या वैदिक धर्मानी स्त्रियांना शिक्षण घेण्याचा आणि धर्मग्रंथ वाचण्याचा अधिकार नाकारला होता त्याचा धिक्कार करून देशात प्रथमच स्त्रियांनसाठी पहिली शाळा काढली. शिक्षणाची दारी खुली केली. म.जोतीबा फुलेंना खूप विरोध झाला तरी त्यांनी स्त्रिशिक्षणाचे कार्य सोडले नाही. आणि तेवढयाच जिददीने सावित्रिबाई फुले यांनी साथ दिली. त्यामुळे आज स्त्री स्वाभिमानाने जगत आहेत. प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने कार्यकरून आपल्या कार्य कर्तृत्वाचा ठसा उमठवत आहेत म. जोतीबा फुले यांच्या स्त्री विचाराविषयी डॉ.यशवंत मनोहर लिहितात'' जोतीबा हे अखिल स्त्री समाजाचे मुक्ती युध्दा आहेत. त्यांनी एक अखंड गुलामाला माणूस होण्याचे तत्वज्ञान दिले आणि स्त्रीला गुलामीच्या मगरमीठीतून सोडविण्यासाठी प्रतिगाम्याचा छळ झेलत अंदोलनही केले गुलामीचा उंबरठाच स्त्रीवर पायदेउन खिदळत होता. दृष्ट उंबरठाच तोडून स्त्रीला बाहेर आणणे आणि तिचा पंखासाठी नवे आकाश जन्माला घालणे हे युगकार्य जोतीबांनी केले.... स्त्रियांना माणूसकीचे हक्क देण्यासाठी त्यांना धर्माच्या दास्यातून मुक्त करण्यासाठी एकोणीसाव्या शतक हलवून सोडलं''[3] पण नंतरच्या काळात तिच्यावर अनेक बंधने घालण्यात आले. म.जोतीबा फुल्यांचे क्रांतीकार्य त्यांच्या नंतर समाजपर्यंत पोचले नाही त्यांच्या विचार विरूध्द/क्रांती—विरूध्द प्रतिक्रांती करण्याचा प्रयत्न केला.आज देखील एकविसाव्या शतकात स्त्रीयांना विविध धर्मरूढी, परंपरा, अंधश्रध्दा, जात, धर्म, पंथ आणि सांस्कृतिक गुलामित डांबण्याचा प्रयत्न होत आहे. तिचे लैंगिक, मानसिक शोषण केले जात

आहे. पुरूष प्रधान संस्कृतीची आज देखील स्त्रीबळी आहे. स्त्री स्त्रियांना आपल्या गुलामीची जाणीव घेउ नये अशी व्यवस्था या देशात उभी केली जात आहे. स्त्रियांदेखिल त्यास मुक्याने सामोरे जात आहेत. आपल्या उधारकर्ता, शिक्षण देणारे म.जातीबा फुले व सावित्रीबाई फुले होत्या यांचे भानदेखिल आमच्या स्त्रियांना नाही. याचे वाईट वाटते—

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री**

तथागत गौतम बुध्द आणि म.जोतीबा फुले यांच्या नंतर स्त्रियांच्या मनात आत्मभान निर्माण करून कायदयाने संरक्षण देण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शूद्रांतिशूद्र आणि स्त्रियांना पशूवत लेखना—या मनुस्मृतीचे दहन करून विषमतावादी मूल्ये नाकारण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील शूद्रांतिशूद्रआणि स्त्रियांचे दास्य गुलामी नष्ट करण्यासाठी प्रथम हिंदु कोडबिलाच्या माध्यमातून हिंदू धर्मात स्त्रियांचे असलेले स्थान उंचविण्यासाठी कायदा करण्याचा प्रयत्न केला. रात्रन दिवस मेहनत घउन हिंदू कोडबिल तयार केले, स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने हक्क देण्याचे ठरवले व बिल संसदेत मांडले पण हिंदू धर्मातील धर्माधलोकांनी स्त्रियांनी, त्यास विरोध केला. ते बिल संसदेत मंजूर होउ शकले नाही. डॉ.बाबासाहेब आंबडकरांनी बील मंजुर न झाल्या मुळे आपल्या मंत्री पदाचा राजीनामा दिला व नंतर मसूदा समितीचे अध्यक्षझाल्या नंतर भारतीय संविधान्यात विशिष्ट कायदयाच्या माध्यमातून स्त्रियांना पुरूषंच्या बरोबरीने अधिकार दिले. भारतीय संबिधानानुसार भारत देशात यापासून पुढे स्त्री—पुरूष असा भेद मानला जाणार नाही असा कायद किला म्हणन म.जोतीबा फुले यांच्या नंतर स्त्रियांच्या उन्नतीचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीच केले. आज विविध क्षेत्रात स्त्री पुरूषंच्या बरोबरीने कार्य करत आहे.तर कधी एक पाउल पुढे टाकत आहेत. याचे श्रेय फक्त आणि फक्त बुध्द, फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनाच देवा लागले‘‘ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान म्हणजे या देशातील समाजरचनेला निराळे तात्विक अधिष्ठाण देणारे तत्वज्ञान होय. वरवरची डागडुगची बाबासाहबांना मान्य नाही. सामान्यत: १९३५ —४० सालानंतरच्या त्यांच्या प्रत्येक शब्दात येथील वैदिक समाजरचनेच्या पर्यायची मांडणी केली जात आहे. हे दिसते क्रांती हेच त्यांच्या तत्त्वज्ञानाचे नांव आहे. हे सुधारणेचे तत्त्वज्ञान नव्हे हे तत्वज्ञान क्रांतीचे आहे. मुळापासून सगळा समाज बदलून टाकण्याचे हे तत्त्वज्ञान आहे. हे कुठेही न थांबणारे सतत प्रायोगिक तत्त्वज्ञान आहे. समाज क्रांतीचा एवढा सर्वंकश एवढा मुलगामी एवढा स्पष्ट आणि एवढा प्रभावी विचार आज तरी भारत देशात फक्त बाबासाहेब आंबेडकरांचाच आहे.’’४ याची जाणीव इथल्या धर्माशक्तीला आहे. म्हणून आज आंबेडकरवादाला ते घाबरतात, अणि त्याचा नायनाट करण्यासाठी या क्रांती विरूध्द प्रतिक्रांती करण्यासाठी ते आज सज्ज झाले आहे. साम, दाम, दंड भेदाची नीती वापरूण ते फक्त आणि फक्त आंबेडकरवाद नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण ते अशक्य आहे हे ते विसरतात की आंबेडकरवाद जनतेचा स्वीकार आहे. आज आपण एकविसाव्या शतकात, विज्ञानवाद, बुध्दिवादी विचार स्वीकारला आहे. तरी काही बुरसटलेल्या धर्मांध लोकांच्या मनात रूढी परंपरेचे विषमतेचे बुरसटलेले जळमटे जळून गेले नाहीत. स्त्री विषयत्यांच्या मनात असणारा लिंगभेदी, दुष्टिकोन बदललेला नाही म्हणून आज देखील स्त्रियांचा अपमान करण्यासाठी पोथी — पुरणातील विषमतावादी प्रतिमा, प्रतिकांचे दाखले दिले जातात. या वरून त्यांची एकूण विषमतावादी पुरूषप्रधान मानसिकता लक्षात येते. त्यांच्या मनावर असणारा मनुष्यवादी विचारांचा पगडा दिसून येतो. भारती संविधानाची शपत घेउन देखील त्याच्या विचारांची कशी पायमाली केली जाते हरताळ फासून आपले पारंपारिक सनातानी विचारांचे समर्थन केले जाते. विकासाचा बुरखा पंधरून समाजाची दिशाभूल केली जात आहे. अशा परिस्थितीत सर्व स्त्री शूद्रांतिशूद्राच्या उन्नतीचा विचार हा आंबेडकरवाद आहे. याचे भान भारतीय समाजाने ठेवले पाहिजेभूलभूलायत न अडकता आपल्या प्रगतीचा समतेचा आणि मानवतेचा जो विचार संविधानाने आपणास दिला आहे. त्याचे रक्षण करणे आपले कर्तव्य आहे. याची जाणीव इथल्या स्त्रीशूद्रांना ठेवणे गरजेचे आहे. यावरच आपल्या पुढिल पिढयांचे भवितव्य अवलंबून आहे. त्यांच्या वाठयाला गुलामी, दास्य, लाचारी विषमता यासाठी येईल तेव्हा ते म्हणतील आपले पूर्वच किती निर्बुध्द होते. असे म्हणण्याची वेळ यांच्यावर येउ नाही. म्हणून आपण कर्तव्याची योग्य जाणीव ठेउन वर्तन करणे काळाची गरज आहे. यातच या देशातील, शूद्रांतिशूद्र महिला, अदिवासी समाजहित आहे.

**संदर्भ :**

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ''क्रांती – प्रतिक्रांती'' प्रदीप रघुनाथ रोडके प्रकाशन, नागपुर पृष्ठए – ४,५.
२. डॉ. यशवंत मनोहर : दुसरे बौध्द साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण उस्मानाबाद पृष्ठ – १८ – १९
३. तत्रैव – ' समाजपरिवर्तनाच्या दिशा ' युगसाक्षीप्रकाशन नगपूर – पृष्ठ – २६ आपल्या क्रांतीचे शिल्पकार
४. जत्रेव – बुध्द, फुले, आंबेडकर – युगसाक्षीप्रकाशन नगपूर – पृष्ठ क्र. ८ – १०